E.Abarve/N026

F/C

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
जिल्हा रुग्णालय,नाशिक
अनंत कान्हेरे मैदान समोर, त्रंबकरोड नाशिक-४२२००२

दुरध्वनी कमांक:- २५७२०३८ Email ID: cs_nashik@rediffmail.com

जा. क्र. जिरुना/अवै.भांडार/न.क्र. ५३/ दरपत्रक / /२०२६ दिनांक.१९ ऑगस्ट, २०२६

प्रति,
मा. सह संचालक,
आरोग्य सेवा (खरेदी कक्ष),

विषय :- एसएनसीयु विभागाकरिता मिल्क कल्चर दर पत्रक प्रसिध्द करणे बाबत....
संदर्भ :- या कार्यालयाची मंजुर टिप्पणी दि.१४/०८/२०२६

मा. महोदय,

जिल्हा शल्य चिकित्सक नाशिक कार्यालया मार्फत सन २०२६ - २७ मध्ये उपलब्ध होणाऱ्या MPJY FUND या खर्चाच्या अनुदानातुन एसएनसीयु विभागाकरिता मिल्क कल्चर इत्यादी बाबत दर मागविण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी दरपत्रक मागविण्यासाठी सोबत दरपत्रक नमुना सादर करण्यात आला आहे.

तरी सदर ई - दरपत्रक आरोग्य सेवेच्या ई - पोर्टलवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

(डॉ. सतिषकुमार वसंत शिंपी)
जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक

प्रत माहितीस्तव सविनय सादर -
मा.सहसंचालक , खरेदी कक्ष , आरोग्य सेवा, संचालनाय, मुंबई.
मा. उपसंचालक,आरोग्य सेवा,नाशिक मंडळ,नाशिक.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
जिल्हा रुग्णालय,नाशिक
अनंत कान्हेरे मैदान समोर, त्रंबकरोड नाशिक-४२२००२
दुरध्वनी क्रमांक:- २५७२०३८ Email ID: cs__nashik@rediffmail.com


# जाहीर नोटीस ( दरपत्रके आमत्रंण पत्र )

सुचित करण्यात येते की,जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक कार्यालयामार्फत सन २०२६-२०२७ मध्ये उपलब्ध MPJY Fund होणाऱ्या खर्चाच्या अनुदानातुन एस एन सी यु विभागाकरिता मिल्क कल्चर संबंधीतचा इत्यादी बाबत दर मागविण्याचे निश्चित केले आहे. तरी इच्छुक पुरवठाधारकांनी व्यापारी लिफाफा व खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधीत प्रशासकीय कार्यालय, जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी तसेच उपरोक्त इ.मेल व्दारे दरपत्रक, सादर केलेचे अवगत करावे.मोहरबंद तांत्रिक व व्यापारील लिफाफा स्वतंत्र सादर करण्यात यावा.

## दरपत्रके सादर करण्याऱ्यां पुरवठाधारकांसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती -

०१) इच्छुक पुरवष्ठाधारकांनी बाबनिहाय ( Itemwise) दरपत्रके मोहरबंद लिफाप्यात सादर करावीत.यावर सदर जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर सादर केलेले आहे.त्याचे नांव असावे.

०२)एका पुरवठाधारकास बाबनिहाय फक्त एक दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे.कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये. असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबधाचा संघर्ष म्हणुन समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकरण्यात येतील.उदा.जर दोन कंपन्या एकाच बाबीसाठी / प्रकल्पासाठी / निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती कंपनी एक्स चा मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्य भागधारक असेल तीच व्यक्ती कंपनी वाय ची मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्य भागधारक नसावी

०३)निर्माणकर्त्याचा अधिकृत विक्रेता, ठोक व्यपारी यांना दरपत्रक सादर करता येतील दरपत्रकात पुरवठा करण्यात येणाऱ्या बाबी बददलची सविस्तर माहिती जसे मौटेल, मेक इत्यादी नमुद करणे आवश्यक आहे यादीत विर्निदिष्ट पुरवठा करणे बाबतचा पुर्वानुभव दाखला जोडण्यात यावा.

०४)आपल्या व्यापारी संरथेचा वरतु व सेवा कर क्र. (GST Number) प्रमाणपत्र व पॅन कार्ड ची छायांकीत प्रत सांक्षांकित करुन जोडावी.

०५)संरथा/दुकान,साहीत्य/पुरवठा/विक्री विषयक वैध नोंदणी दाखला सोबत जोडावा.

०६)दरपत्रके सादर करणेसाठी पत्ता / ठिकाण - प्रशासकीय कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक जिल्हा रुग्णालय, नाशिक आवार, त्र्यंबकेश्वर रोड, नाशिक. पिन कोड ४२२००१.

०७)यादी मधील (रुग्णालयीन वापरसाठी लागणारे नित्यउपयोगी वस्तु) आवश्यकते नुसार खरेदी केली जातील.

०८)विहीत कालावधीत पुरवठा न झाल्यास शासकीय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

०९)विहीत नमुन्यातील वरतुचा सेवा कर(GST Number) सहित देयके स्विकारण्यात येतील, दर हे सर्व करांसहित व उचल ठेव इमाली पोहच खर्चासहीत असावे.

१०)खरेदी केलेल्या बाबींची पोहच जिल्हा रुग्णालय,नाशिक येथे करावी लागेल.

Scanned with OKEN Scanner

११)मंजुर न्युनतम दरांवर पुरवठाधारकास पुरवठा करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने खरेदी करावी लागल्यास फरकाची रक्कम न्युनतम दर धारकांकडुन वसुल केली जाईल.

१२)दर हे अधीकतम विक्री किंमतीपेक्षा (MRP) जास्त नसावे. वस्तु व सेवांच्या दराबाबत शासकीय खरेदी बाबतच्या मार्गदर्शक सुचना शासन निर्णय,परिपत्रक यांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१३)(रुग्णालयीन नित्यउपयोगी वस्तु) दर्जा हा सर्वोत्तम असावा. वस्तु हया आय एस आय (ISI MARK) मार्क किंवा आयएसआय मार्कशी समांतर दर्जाधारक असावा.

१४)स्थानीक पुरवठा दारांना प्राधान्य राहील तसेच इच्छुक पुरवठाधारकास कोणत्याही शासकीय विभागाने खरेदी प्रक्रियेसाठी काळया यादीत टाकलेले नसल्या बाबतचे प्रमाणपत्र न्यायिकितर मुद्रांकावर (स्टॅम्प पेपरवर) लिहुन देणे बंधनकारक आहे.

१५)दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांकापासुन आठ दिवस संध्याकाळी ५.०० वाजेपर्यत असेल(कार्यालयीन सुटटी वगळुन)उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१६)दरपत्रके उघडण्याची तारीख या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल.

१७)दरपत्रकासोबत सादर करण्यात येणारे दस्तावेज(कागदपत्रे) राजपत्रित अधिकरी किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडुन साक्षांकित करुन सादर करावे.

१८)कोणतेही लेखी तोंडी कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपुर्ण अथवा काही भागाची खरेदी प्रकिया स्थगित ठेवण्याचे व खरेदीचे सर्व अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांनी राखुन ठेवले आहेत. मान्य न्युनतम दर हे दर स्विकृत केल्या पासुन एक वर्षासाठी वैध राहतील.

(डॉ. सतिषकुमार वसंत शिंपी)
जिल्हा शल्य चिकित्सक,नाशिक.

Scanned with OKEN Scanner

# व्यापारी लिफाफा

एस एन सी यु आवश्यक वस्तुचा पुरवठा करणेबाबत यादी

| अ.क. | वस्तुचे नाव | वस्तुचे मार्क (कंपनी) | एका नगाची किंमत | एकुण दर | जीएटी | फायनल दर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस एन सी यु. विभागाकरिता मिल्क कल्चर करार वार्षिक दर | | | | | |

१)दरपत्रके सिलबंद करुन प्रशासकिय कार्यालय, जिल्हा रुग्णालय,नाशिक येथे पाठविण्यात यावे.
२)वरिल यादीतील साहित्य/वस्तु हया आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येईल.
३) दरपत्रके मंजुर अथवा नामंजुर करण्याचे अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय, नाशिक यांनी राखुन ठेवले आहे.

सही
पुरवठा धारकांचे नांव
पुरवठा संस्थेचे नांव
पत्ता

Scanned with OKEN Scanner

To be submitted on Original letter head/pad

Annexure-६

निविदाकाराचे हमी पत्र

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र.भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाम/उद्योग-४ दिनांक ०१ डिसेबंर २०१६ नियम ४.२.५ नुसार मी/ आम्ही..............................................या हमीपत्राद्वारे लिहुन देतो की, दरपत्रक मागविण्या-या खरेदी प्राधिका-याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध नसुन हितसंबधाबाबत संघर्ष नाही तसेच खरेदी प्राधिका-याकडे सादर करण्यात आलेले दरपत्रक हे एकल असुन दुस-या कोणत्याही संस्थेसोबत संयुक्तीक किंवा संगनमताने साखळी करुन दरपत्रक भरलेले नाही असे आढळुन आल्यस नियमानुसार योग्य त्या दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

दिनांक

ठिकाण

दरपत्रक सादर कर्त्याची स्वाक्षरी व शिक्का

Scanned with OKEN Scanner